## राणीबाग : १५० वर्षे

**संपादक : हुतोक्षी रुस्तमफ्राम/शुभदा निखार्गे**

**दीपक घारे**

# मानाचे पान

ब्रिटिशांनी भारतीयांना जो अनेकविध प्रकारचा वारसा दिला त्यांपैकी निसर्ग व वास्तुकला यांचा मिलाफ असलेली वनस्पती उद्याने हा एक महत्त्वाचा वारसा आहे. जनसामान्यांना परिचित असलेली राणीची बाग ही त्या वारशांचं मुंबईतीलच नव्हे तर देशातील एक उत्तम उदाहरण आहे. एकेकाळचे 'व्हिक्टोरिया गार्डन्स'चे नामांतर आज 'वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय' असे करण्यात आलं असलं तरी आजही 'राणीबाग' म्हणूनच ती ओळखली जाते. १८६२ मध्ये खुले करण्यात आलेल्या या उद्यानाला १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने 'राणीबाग : १५० वर्षे' हे भरपूर रंगीत छायाचित्रं असलेलं मोठ्या आकाराचं देखणं पुस्तक प्रकाशित झालं आहे. याच नावाने आधी प्रकाशित झालेल्या इंग्रजी पुस्तकाचा हा अनुवाद आहे. 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी', 'नॅशनल सोसायटी ऑफ द फ्रेंड्स ऑफ द ट्रीज' आणि 'सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन फाऊंडेशन' अशा मुंबईतल्या तीन संस्थांनी ते प्रकाशित केलं आहे. जमनालाल बजाज फाउंडेशन, पिरोजशा गोदरेज फाउंडेशन आणि टाटा रिअल्टी अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या संस्थांनी त्यासाठी आर्थिक मदत केलेली आहे. या पुस्तकाच्या जडणघडणीत अनेकांचं सहकार्य लाभलेलं आहे, पण त्यात हुतोक्षी रुस्तमफ्राम, शुभदा निखार्गे या 'सेव्ह राणीबाग'च्या विश्वस्तांचा विशेष उल्लेख करायला हवा. मराठी अनुवादासाठी जयप्रकाश सावंत ह्यांच्या साक्षेपी संपादनाची पुस्तकाला उत्तम जोड मिळालेली आहे.

उत्तम निर्मितिमूल्यं असलेलं हे पुस्तक एखाद्या कॉफी टेबल बुकसारखं वाटतं. पण त्यातल्या छायाचित्रांमध्ये आणि मजकूरात आपण गुंतत गेलो की त्याची व्याप्ती लक्षात येते. कॉफी टेबलबुकच्या आकर्षक मांडणीपलीकडे बरंच काही त्यात आहे. वनस्पतीसृष्टी आणि जीवसृष्टी ह्यांची शास्त्रीय तरीही रंजक माहिती; वास्तुकला, वनस्पती उद्यान आणि विज्ञान ह्यांची सागड घालणारी ब्रिटिशांची सौंदर्यदृष्टी; जीवनशैलीत आणि महानगरी जीवात निसर्ग व पर्यावरणाचं असलेलं महत्त्व; राणीबागसारखी उद्यानं टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणारी समाजाची सजगता अशा अनेक पैलूंना हे पुस्तक स्पर्श करतं. नैसर्गिक वारशाचं एक नवं भान तर हे पुस्तक देतंच पण तो वारसा टिकवून ठेवण्याची, तो वृद्धिंगत करण्याची प्रेरणाही देतं.

राणीची बाग म्हणजे प्राणिसंग्रहालय असं एक समीकरण रूढ झालेलं आहे. पण तिची स्थापना वनस्पति उद्यान म्हणून झाली आणि ते तिचं अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे. २८६ प्रजाती,



३,२१३ वृक्ष आणि ८५३ वनस्पती जाती या बागेत आहेत. वनस्पती उद्यानासाठी दोन तृतीयांश जागा देण्यात आलेली आहे आणि उरलेल्या एक तृतीयांश जागेत प्राणिसंग्रहालय आहे. म्हणूनच २००७ साली वनस्पती उद्यानावरच घाला घालणाऱ्या भपकेबाज आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयाचा प्रस्ताव मांडण्यात आला तेव्हा पर्यावरणप्रेमी संस्था आणि नागरिकांनी त्याला कडाडून विरोध केला आणि हा प्रस्ताव रद्द झाला!

'सिंगापूर बोटॅनिक गार्डन्स'चे संचालक डॉ. नायगेल टेलर ह्यांनी म्हटल्याप्रमाणे 'वनस्पती उद्याने नागरिकांना निसर्गाशी जवळीक साधण्यासाठी मदत करतात. अधिक शाश्वत जीवनपद्धती अंगीकारण्यासाठी प्रेरणा देतात, विद्यार्थ्यांना निसर्गशिक्षणासाठी आवश्यक ते वातावरण उपलब्ध करून देतात. तर वनस्पती अभ्यासक आणि निसर्गप्रेमी नागरिकांसाठी जितीजागती संग्रहालये आणि निसर्ग निरीक्षणाचे शिकवणी-वर्ग बनतात. 'बिट्टू सेहगल ह्यांच्या पहिल्याच लेखात हेच सूत्र विस्तारानं आलं आहे. सेहगल ह्यांना निसर्गध्वनी आणि अरण्यदृश्यांचा हा 'हिरवा ठेवा' मोहीत करतो. बीज-प्रसार करणारी बटवाघळं, इतरांसाठी कामं करणारी मुंग्यांची रांग, वृक्षवल्लींच्या आधाराने जगणारे पक्षी, सरडे आणि फुलपाखरं अशा तपशिलांमधून राणीची बाग त्यांनी जिवंत केली आहे. राणीच्या बागेसारखी स्थळं अनुभवसिद्ध शिक्षणाच्या जागा असतात असं त्यांनी म्हटलं आहे आणि बालकांच्या अनेक गटांना राणीबागेची सफर घडवून त्यांनी ते प्रत्यक्षातही आणलेलं आहे.

बिट्टू सेहगल ह्यांचा लेख वर्तमानातलं राणीबागेचं पर्यावरण आणि निसर्गशिक्षणातलं मध्यवर्ती स्थान अधोरेखित करतो तर फिरोजा गोदरेज ह्यांचा लेख स्मरणरंजनात अधिक रमतो. पण हे दोन्ही लेख जनमानसातील राणीबागेबद्दलची भावपूर्ण आत्मीयता व्यक्त करतात. 'एका आनंददायी वनस्पती उद्यानाच्या कालातीत आठवणी' सांगताना फिरोजा गोदरेज त्यात रमून गेलेल्या आहेत. पावसाळ्यातला वृक्षांचा हिरवा-कंच ओलेपणा; उन्हाळ्यातली रक्तकांचन, गुलमोहर, पांगारा, पळस इत्यादी वृक्षांची रंगांची उधळण; फुलं, फळं, वनस्पतींचे नाकाला सुखावणारे मंद-मधुर आणि उग्र गंध अशा विविधांगी अनुभवाचा उल्लेख त्यांनी केलेला आहे. जोडीला वस्तुसंग्रहालयातील वस्तूंच्या निरीक्षणातून इतिहास, कला आणि निसर्ग यांच्याबद्दल आस्था आणि जिज्ञासा कशी निर्माण झाली हेही त्या सांगतात. या लेखासोबत जी चित्रं दिलेली आहेत ती लेखाला एक वेगळं ऐतिहासिक परिमाण देणारी आहेत. स्मरणरंजन हे जसं व्यक्तिगत पातळीवरचं असतं तसंच ते विशिष्ट कालखंडाची स्मृतिरूपं जपणाऱ्या सामाजिक पातळीवरचंही असतं. फिलिप्स अँटिक्सच्या संग्रहातील जुनी दुर्मिळ छायाचित्रं, १९३७ सालच्या एका पुस्तकातील रक्तकांचन, वायवर्ण यांसारख्या झाडांच्या फुलांची वैशिष्ट्यं टिपणारी अभ्यासपूर्ण चित्रं यात आहेत. थॉमस आणि विल्यम डॅनियल या प्रसिद्ध ब्रिटिश चित्रकारांचं दुर्मिळ मुद्राचित्रही यात आहे. आता राणीबागेत असलेला एलिफंटा बेटावरील दगडी हत्ती जेव्हा त्याच्या मूळ जागेवर होता तेव्हाचं हे चित्र आहे. या शिल्पाचा उल्लेख इतरांच्याही लेखात येतो. थोडक्यात सांगायचं तर भारतीय संस्कृती, ब्रिटिशांचं अनुशासन आणि त्यांचा पौर्वात्य संस्कृतीकडे बघण्याचा दृष्टिकोन, त्यांचा भारतीयांवर पडलेला प्रबोधनकाळातला सांस्कृतिक प्रभाव असे सूचक संदर्भ या चित्रांमुळे श्रीमती गोदरेज यांच्या लेखाला लाभलेले आहेत.

या पुस्तकाचा वाचक तीन प्रकारचा असावा अशी संपादकांची अपेक्षा आहे. राणीबागेबद्दलच्या रम्य आठवणी बाळगणारा मुंबईतला सर्वसामान्य नागरिक अथवा मुंबईबाहेरच्या नगरांमधला राणीबागेबद्दल जिज्ञासा असलेला वाचक हा एक प्रकार झाला. अशा वाचकांना वरील दोन लेख किंवा केटी बगलींचा राणीबागेतल्या जीवसृष्टीवरचा रंजक लेख हे नक्कीच आवडतील. वनस्पतीशास्त्र, पक्षीनिरीक्षण, वास्तुकला यात रस असणाऱ्या अभ्यासू वाचकांना मार्सेलिन आलमेडा, मरीअम डोसल, विकास दिलावरी ह्यांचे लेख महत्त्वाचे वाटतील. तर पर्यावरणाविषयी जागरूक असणाऱ्या निसर्गप्रेमी कार्यकर्त्यांना 'सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन कमिटी'चा संघर्ष आणि त्याचा वृत्तांत प्रेरणादायी वाटेल. प्रत्येक लेख म्हणजे राणीच्या बागेचा एकेका दृष्टिकोनातून केलेला फेरफटका आहे आणि त्यातून राणीच्या बागेचं जतन करण्याची नवनवीन कारणं सापडत जातात.

## राणीबाग : संकल्पना

सार्वजनिक उद्यानांची कल्पना ब्रिटिशांनी भारतात आणली. 'कंपनी गार्डन' या नावाने ती उद्याने ओळखली जात. भारतात बाग अथवा उद्यानाची कल्पना रुजली ती मोगलकाळात. युरोपात ग्रीक आणि रोमन काळात उद्यानांचा विकास झाला. पण त्यांची प्रेरणा होती ती इजिप्शियन आणि पश्चिम आशियाई देशांच्या संस्कृतींमध्ये. पुढे फ्रेंचांनी ती आपल्या पद्धतीने विकसित केली. फुलांचे ताटवे, पायवाटा आणि छोटे तलाव ह्यांची भौमितिक रचना ही त्यांची वैशिष्ट्यं होती. इंग्लंडमध्येही बागेची परंपरा आली आणि ब्रिटिश साम्राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध वनस्पतींची त्यात भर पडत गेली. मोगलकालीन उद्याने ही राजप्रासादाचा भाग होती. ब्रिटिशांनी सार्वजनिक उद्याने बांधली ती सर्वसामान्य लोकांसाठी.

विकास दिलावरी ह्यांनी लिहिले आहे की शहरात एका छोट्या संग्रहालयासह मोठे उद्यान उभारण्याची कल्पना १८५७ नंतर प्रत्यक्षात आली आणि जयपूर, अमृतसर, हैदराबाद व मुंबई येथे तशी उद्यानं उभी राहिली व लोकप्रिय झाली. खेळ, मनोरंजन आणि वैज्ञानिक प्रगती ह्यांचा मेळ ह्या उद्यानांच्या संकल्पनेत होता. वस्तुसंग्रहालयाची उद्यानातील छोटी इमारत ही लोकांना विज्ञान, संस्कृती, इतिहास अशा विविध ज्ञानशाखांचा परिचय करून देण्यासाठी होती. अभिजात पुनरुज्जीवन शैलीनुसार उभारण्यात आलेल्या 'राणीबाग'सारख्या उद्यानांची काही वैशिष्ट्यं होती. शिस्तबद्धता व सौंदर्य यांच्याशी कोणतीही तडजोड न करता उद्यानाचा डौलदारपणा व देखणेपण जपणे आणि भेट देणाऱ्या नागरिकांच्या दृष्टिसुखात भर घालणे हे त्यांपैकी एक प्रमुख वैशिष्ट्य होत. असंख्य पायवाटा, जिने, पूल, कारंजी, कृत्रिम तलाव यांबरोबरच ग्रीक आणि रोमन पुतळे, कमानी आणि त्यावरचं नक्षीकाम यातून एक अभिजात शैलीचा स्पर्श झालेली दृश्य ओळख या उद्यानांना होती. गावोगावच्या उद्यानांच्या रचनेमध्ये या उद्यानसंकल्पनेचे पडसाद उमटलेले दिसतात.

सार्वजनिक उद्यानाबरोबरच वनस्पती उद्यानाची संकल्पना एकोणिसाव्या शतकातल्या 'प्रगती कालखंडा'तच रुजली. कृषी क्षेत्रातील संशोधन व सुधारणा तसेच सुधारित वनस्पती आणि बियाणी ह्यांचा प्रसार व्हावा, वनस्पती, फळे व भाज्यांचं उत्पादन वाढावं आणि त्यासाठी बाजारपेठ मिळावी ह्या उद्देशाने एक केंद्र असावं ही कल्पना वनस्पती उद्यानामागे होती. ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो यांच्यासारखे राजकीय तत्त्वज्ञ आणि अर्थतज्ज्ञ ह्यांनी आर्थिक विकासासाठी कृषी विकासाचं असलेलं महत्त्व जाणलं होतं. मुंबईत १८३५ मध्ये शिवडी येथे वनस्पती उद्यान करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या. परंतु नंतर हे उद्यान भायखळा येथे हलवण्यात आले आणि राणीबागेची निर्मिती झाली. मरिअम डोसल ह्यांनी आपल्या लेखात शिवडी इथल्या प्रस्तावित वनस्पती उद्यानाचा आरंभकाल वर्णिला आहे. या उद्यानाचा भर संशोधन, वनस्पतींच्या प्रजातींची देवाणघेवाण, प्रशिक्षण, उत्पादन अशा व्यावहारिक बाबींवर असला तरी उद्यानाच्या संरचनेत उपयुक्तता आणि सौंदर्य यांचा मेळ घातला पाहिजे यावर आयोजकांचा कटाक्ष होता.

## राणीबाग : इतिहास

राणीच्या बागेचा इतिहास, नियोजन व रचना यांबद्दलची माहिती मुख्यतः मरीअम डोसल आणि विकास दिलावरी ह्यांच्या लेखांमधून येते. हे उद्यान मुळात शिवडीला होते. 'ॲग्रिकल्चरल ॲंड हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया' या संस्थेने ते सुरू केले. ही संस्था कोलकाता येथील धर्मप्रचारक विल्यम कॅरी यांनी स्थापन केलेल्या याच नावाच्या संस्थेची शाखा होती. मुंबई इलाख्यातील प्रयोगशील सभासदांना बियाणे आणि रोपे पुरवणे आणि शेतीमालाचा दर्जा सुधारणे हे या संस्थेचं उद्दिष्ट होतं.

या नियोजित उद्यानात पाच विभाग असणार होते. पहिल्या विभागात देशी पाककलेत वापरल्या जाणाऱ्या भाजीपाल्याचा समावेश होता आणि त्याचं नाव होतं, पाकशाला उद्यान. दुसरा विभाग फळबाग म्हणून विकसित करण्यात येणार होता. त्यात देशी आणि विदेशी फळांच्या सुधारित जाती असणार होत्या. तिसरा विभाग कापूस, ऊस, मसाले, तृणधान्ये, धान्ये अशा वसाहतीतील व्यावसायिक उत्पादनांचा होता. चौथा विभाग औषधी वनस्पतींचा होता आणि पाचव्या

विभागात देशी वनस्पतींच्या संपूर्ण संग्रहाची नोंद करणारी शास्त्रीय प्रयोगशाळा असणार होती.

डॉ. जॉर्ज बर्डवूड आणि डॉ. जॉर्ज ब्युइस्ट या दोघांनी अनुक्रमे भायखळा आणि शिवडी उद्यानासाठी महत्त्वाचं योगदान दिलं. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर हेन्री बार्टल फ्रेअर ह्यांनीही हॉर्टिकल्चरल सोसायटीच्या कामात भरपूर रस घेतला. शिवडी येथील जागा मुख्य शहरापासून दूर असल्यामुळे गैरसोयीची होती. म्हणून हॉर्टिकल्चरल सोसायटीला भायखळा येथे जागा देण्यात आली. त्यासाठी वस्तुसंग्रहालय समितीशी एकत्रीकरण करून वनस्पती उद्यान आणि वस्तुसंग्रहालय एकत्रितपणे उभारण्याची अट घालण्यात आली व १८६२ रोजी व्हिक्टोरिया गार्डन्स किंवा राणीची बाग लोकांसाठी खुली करण्यात आली.

राणीबाग म्हणजे वनस्पती उद्यान हे वास्तव मरीअम डोसल ह्यांनी अनेक पुराव्यांच्या आधारे स्पष्ट केलेलं आहे.

विकास दिलावरी ह्यांचा लेख राणीबागेच्या रचनेतील निसर्ग आणि वास्तुकला यांचा मिलाफ साधणाऱ्या ब्रिटिशांच्या सौंदर्यदृष्टीचा वेध घेणारा आहे. राणीबागेच्या रचनेचं मर्म उलगडताना दिलावरी गेल्या दीडशे वर्षांचा सांस्कृतिक इतिहासच एका परीने सांगतात. दिलावरी ह्यांच्या म्हणण्यानुसार राणीच्या बागेची रचना अभिजात पुनरुज्जीवन शैलीनुसार (क्लासिकल रेनेसान्स स्टाइल) करण्यात आली. व्हिक्टोरियन कालखंडात व्यापार उदीम आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला जसं महत्त्व होतं तसं पुनरुज्जीवित अशा अभिजात सौंदर्यदृष्टीलाही स्थान होतं.

राणीच्या बागेला सुनिश्चित असे दोन अक्ष आहेत. पूर्व-पश्चिम हा प्रमुख अक्ष आहे तर उत्तर-दक्षिण हा दुय्यम अक्ष आहे. हे दोन्ही अक्ष एका मोठ्या गोलाकार जागेत विसर्जित होतात. दोन्ही अक्षांच्या शेवटी सुरेख शिल्पं आहेत. दोन्ही अक्षांच्या भोवती विविध प्रकारचे डेरेदार वृक्ष व अनेक अंतर्गत बगीचे आहेत. या अक्षांव्यतिरिक्त चहूबाजूंना फुटणाऱ्या पायवाटांचं जाळं उद्यानभर पसरलेलं आहे.

राणीबागेचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे निसर्गाशी मेळ साधणारी वास्तूंची रचना. ससून टॉवर, भाऊ दाजी लाड संग्रहालयाची इमारत आणि प्रवेशद्वाराची तिहेरी कमान या वास्तूंनी बनलेला प्रवेशाचा परिसर निसर्ग अनुभवण्यास अनुकूल अशी वातावरणनिर्मिती करतो. आडव्या-उभ्या पट्ट्यांची लाकडी जाळी असलेली, परीकथेतल्या राजवाड्यासारखी भासणारी वनस्पती संरक्षिका (वूडलॅथ कॉंझर्वेटरी) जशी वैशिष्ट्यपूर्ण आहे तशीच इथली स्मारकशिल्पही भोवतालच्या हरित निसर्गाशी एकरूप होणारी आहेत. आनंदविहारासाठी तयार केलेल्या वनस्पती उद्यानाचा प्रेरणादायी वास्तुघटकांशी जाणीवपूर्वक मेळ घातल्यामुळे त्यातून अभिजात स्वरूपाचा स्वर्गीय आनंद कसा मिळू शकतो याचा वस्तुपाठच दिलावरी ह्यांच्या लेखातून मिळतो.

विकास दिलावरी ह्यांनी वास्तुरचनेतले बारीक-सारीक तपशील त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांसह उलगडून दाखवले आहेत. त्यातले ऐतिहासिक तपशीलही तत्कालीन समाजधुरीणांच्या आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या सामाजिक आस्थेविषयी आणि दूरदृष्टीबद्दल बरंच काही सांगतात. व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम (आताचे डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालय) १८७२ साली पूर्ण झालं. वस्तुसंग्रहालयाच्या बांधकामाचा खर्च लोकांच्या वर्गणीतून आणि धनाढ्य नागरिकांच्या देणग्यांमधून करण्यात आला. जगन्नाथ शंकरशेट, मंगळदास नथूभाई, रुस्तमजी जीजीभाई आणि डेव्हिड ससून यांचा त्यात पुढाकार होता. डॉ. भाऊ दाजी लाड आणि डॉ. जॉर्ज बर्डवूड यांच्यावर निधी उभारण्याची जबाबदारी होती. निधी उभारणीस चालना देण्यासाठी बर्डवूड ह्यांनी वस्तुसंग्रहालयाचं वर्णन आकर्षक शब्दांमध्ये असं केलं होतं, 'हॉल ऑफ वंडर विदिन द गार्डन ऑफ डिलाइट' (आनंदवनातील स्तिमित करणार दालन)! जनतेकडून १,१६,१४१ रुपये जमा करण्यात आले आणि शासनाने आणखी १,००,००० रुपये दिले. २००३ मध्ये या संग्रहालयाचं नूतनीकरण करण्यात आलं आणि त्याचं गतवैभव प्राप्त करून देण्यात आलं.

दिलावरी संग्रहालयाच्या वास्तूचं वेगळेपण सांगतात ते असं : मुंबई शहरात मुंबई विद्यापीठासारख्या त्या काळातल्या वास्तू निओ-गॉथिक शैलीत बांधल्या गेल्या. पण राणीबागेतल्या वस्तुसंग्रहालयाने अभिजात शैलीचा (क्लासिकल) मार्ग अनुसरला. दोन्ही बाजूंना समतोल राखणाऱ्या या इमारतीला उंच आयताकृती